# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** पालघर **P.S.(ठाणे):** पालघर
**Year (वर्ष):** 2023
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0260
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**26/10/2023 18:40

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
   1. **Day(दिवस):** गुरूवार
   **Date From (दिनांक पासून):** 26/10/2023
   **Date To ( दिनांक पर्यंत):** 26/10/2023
   **Time Period (कालावधी):**
   **Time From (वेळेपासून):** 09:53 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 18:18 बजे

   (b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
   **Date (दिनांक ):** 26/10/2023 **Time (वेळ):** 18:18 बजे

   (c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
   **Entry No. (नोंद क्र.):** 029
   **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 26/10/2023 18:18 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
   1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
   उत्तर, 500 किमी **Beat No. (बिट क्र.):**
   (b) **Address (पत्ता):** मनिषा डेअरी, पाचबत्ती, ,पालघर

   (c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
   **Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
   **District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** रत्नाकर लक्ष्मण उगलमुगले

(b) **Father's Name (वडील चे नाव) :** उगलमुगले

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1979

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | औदुंबर निवास, इस्कॉन मंदिर,जवळ वेवुर रोड,आंबेडकरनगर पालघर पुर्व, पालघर,पालघर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | बोईसर पोलीस स्टेशन,पालघर,पालघर,पालघर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | सुनिल बाबुराव सावंत | | | 1. शालीनी अपार्टमेंट रूम न5 , लक्ष्मीनारायण मंदीराच्या मागे, माहीम रोड पालघर ,पालघर, पालघर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दिनांक 26/10/2023.

मी रत्नाकर लक्ष्मण उगलमुगले, वय-44 वर्षे, व्यवसाय-नोकरी, पोलीस नाईक बक्कल नंबर -772, नेमणुक-बोईसर पोलीस स्टेशन, जि.पालघर, रा.औदुंबर निवास, इस्कॉन मंदिर जवळ वेवुर रोड, आंबेडकरनगर पालघर पुर्व ता.जि.पालघर मो.क्र. 9960256928 समक्ष हजर राहून फिर्याद लिहून देतो की,

मी वरील पत्यावर माझे परीवारासह राहत असून मी पालघर पोलीस दलात बोईसर पोलीस ठाणे येथे पोलीस नाईक म्हणून कर्तव्यास आहे. माझ्याविरूध्द तारापुर पोलीस ठाणे गुन्हा रजि.नं. 03/2015 भा.द.वि.सं. कलम 376 अन्वये गुन्हा दाखल होता. त्याअनुषंगाने माझ्याविरूध्द अतिरीक्त सत्र न्यायालय, पालघर येथे चालु असलेल्या खटल्यामध्ये मला पालघर न्यायालयाने निर्दोष मुक्त केलेले आहे. त्यानंतर मला पदोन्नती मिळणेकरीता मी मा.पोलीस अधीक्षक, पालघर यांचकेडे विनंती अर्ज केलेला आहे. मी केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने मा.पोलीस अधीक्षक, पालघर कार्यालयाकडून दिनांक 05/10/2023 रोजी माझ्याविरूध्दच्या खटल्यामध्ये माझे निर्दोष मुक्ततेविरूध्द अपील केलेले आहे अगर कसे? तसेच दोषमुक्ती ही समर्थनिय आहे अगर कसे? याबाबतची अहवाल मिळणेकामी मा. अतिरीक्त सरकारी अभियोक्ता, अतिरीक्त सत्र न्यायालय, पालघर श्री.सावंत यांना पत्रव्यवहार करण्यात आलेला आहे. तो श्री.सावंत यांना दिनांक 05/10/2023 रोजी प्राप्त झालेला आहे. पोलीस अधीक्षक कार्यालयाकडून सरकारी वकीलांना झालेला पत्रव्यवहार मला माहित झाल्यानंतर त्या अनुषंगाने मी सरकारी वकील श्री.सावंत यांची भेट घेवून मला केसमधून निर्दोष केल्याचा अहवाल लवकर पाठविण्याबाबत सांगीतले, जेणे करून माझी रखडलेली पदोन्नती मला लवकर मिळेल असे सांगितले असता त्यांनी माझ्याकडे 10,000/- रूपये लाचेची मागणी केली होती. तेव्हा मी श्री.सावंत यांना माझी आर्थिक परिस्थिती चांगली नाही तसेच मला खोटया गुन्हयामध्ये अडकवून माझे नोकरीचे नुकसान केले व त्यामुळे माझी पदोन्नतीसुध्दा झालेली नसल्याने मी मानसिकरित्या खचून गेलेलो आहे. जर आपण लवकर माझा अहवाल सादर केलात, तर मी आपणास भेटेन असे सांगितले होते. त्यानंतर दिनांक 25/10/2023 रोजी मी पोलीस अधीक्षक कार्यालय, पालघर येथे जावून माझ्या पदोन्नतीच्या अर्जावर काम करणारे लिपीक श्री.विलास गोविंद यांना भेटून सरकारी अभियोक्ता श्री.सावंत यांचेकडून अहवाल प्राप्त झाले आहे काय? असे विचारले असता, त्यांनी अदयाप पावेतो अहवाल प्राप्त झाला नसल्याचे सांगीतले. त्यामुळे माझी खात्री झाली की, लोकसेवक श्री.सावंत यांनी माझ्याकडे मागीतलेली 10,000/- रूपये लाचेची रक्कम त्यांना दिल्याशिवाय ते माझा अहवाल पोलीस अधीक्षक कार्यालय, पालघर येथे सादर करणार नाहीत.

परंतू मला लोकसेवक श्री.सावंत यांना लाचेची रक्कम देण्याची इच्छा नसल्याने मी दिनांक 25/10/2023 रोजी त्यांच्याविरूध्द कायदेशीर कारवाई होणेकरीता लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पालघर कार्यालयात हजर राहून स्वहस्ताक्षरात लेखी तक्रार दिलेली आहे.

मी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पालघर चे पोलीस उप अधीक्षक श्री.गावडे यांनी लाचेच्या मागणीची पडताळणी करणेकामी दोन शासकीय पंच साक्षीदार बोलावून घेवून मी दिलेल्या तक्रारीची हकीगत सांगून ती त्यांना वाचण्यास दिली. सदर तक्रारीवर दोन्ही पंचाच्या सहया घेतल्या. त्यानंतर पोलीस उप अधीक्षक श्री. गावडे यांनी मला व दोन्ही पंचांना पडताळणी कारवाई बाबत थोडक्यात माहीती देवून योग्य त्या सुचना दिल्या. तसेच पडताळणी कारवाई कामी शासकीय वाहन क्र. एम.एच. 48, सी.के. 6525 तसेच माझेकडील दुचाकी क्रमांक एम. एच. 48, सी.आर. 0824 चा वापर करण्यात येणार असल्याचे सांगीतले.

त्यानंतर पडताळणी पथकासह शासकीय वाहनाने व माझेकडील दुचाकीने सर्वजण पालघर पश्चिम येथील आर्यन हायस्कुलच्या समोर जावून थांबलो. त्यानंतर माझे अंगावर व्हॉईस रेकॉर्डर लावून पंच नं. 01 यांचेसह माझ्या दुचाकी वाहनाने लोकसेवक श्री.सावंत यांचेकडे पाठविले, त्यावेळी मी लोकसेवक श्री.सावंत यांचेकडे गेलो तेंव्हा ते जेवण करीत होते. त्यावेळी त्यांनी मला न्यायालयाच्या गेटजवळ असलेल्या हॉटेलमधून दोन वडे घेवून येण्यास सांगीतले.

त्याप्रमाणे मी जावून वडे घेवून आलो. त्यानंतर मी लोकसेवक श्री.सावंत यांचेशी माझे कामाच्या अनुषंगाने बोलणी केली, त्यावेळी त्यांनी मला माझेविरूध्दच्या केसमध्ये अपील केले अगर कसे? याबाबतचा अहवाल पाठविण्यात आल्याचे सांगून त्यांच्या कपाटातील फाईलमध्ये त्यांनी पाठविलेल्या अहवालाची छायांकीत प्रत दाखविली. त्यामध्ये माझेविरूध्दच्या खटल्यामध्ये अपील केले नसल्याचे नमुद होते. त्यावेळी मी त्यांच्या परवानगीने सदरच्या अहवालाचा फोटो माझे मोबाईलमध्ये काढून घेतलेला आहे. त्यानंतर मी त्यांना निघू का? असे म्हटले असता, त्यांनी मला कधी भेटणार असे बोलले ''दहा करा'' ''दहा करा, जास्त नाय'' असे म्हणाले. त्यावर मी त्यांना ''दहा हजार, एवढे नाय जमनार, करतो प्रयत्न'' असे बोललो तेंव्हा त्यांनी मला ''एकदाच करा, नंतर अपेक्षा नाय जास्त'' असे सांगीतले. त्यानंतर मी व पंच नं. 1 तेथून निघून पडताळणी पथकाजवळ आलो.
त्यानंतर पोलीस उप अधीक्षक श्री.गावडे यांनी माझेकडील व्हॉईस रेकॉर्डर मध्ये ध्वनिमुद्रीत झालेले संभापण दोन्ही पंचांसमक्ष ऐकले असता, त्यामध्ये सरकारी वकील श्री.सावंत यांनी माझे कामाच्या अनुषंगाने 10,000/- रू लाचेची मागणी केल्याचे आढळून आले.
त्यानंतर पोलीस उप अधीक्षक श्री.गावडे यांनी सांगीतले की, सरकारी वकील श्री.सावंत यांचेकडे तक्रारदार यांचा अहवाल पाठविणे प्रलंबित आहे तो पाठविण्यासाठी श्री.सावंत यांनी लाचेची मागणी केलेली होती. परंतू पडताळणी कारवाई दरम्यान सरकारी वकील श्री.सावंत यांनी तक्रारदार यांचा अहवाल सादर केला असल्याचे सांगीतले असून त्याची छायांकीत प्रतीचा फोटो तक्रारदार यांचे मोबाईल मध्ये घेतलेला आहे. त्यामुळे सरकारी वकील श्री.सावंत हे तक्रारदार यांचेकडे त्यांनी पाठविलेल्या अहवालाचा मोबदला म्हणून लाचेची मागणी तशीच चालू ठेवतात का? याबाबत खात्री करण्याकरीता फोन करून त्यावरून मोबदला म्हणून लाचेची मागणी करतात का? याची पडताळणी करण्यात येणार आहे असे सांगीतले.
त्याप्रमाणे मी माझा मोबाईल क्र. 9309457481 वरून लोकसेवक श्री.सावंत यांचा मोबाईल क्र. 9923039789 वर फोन केला परंतू त्यांनी फोन उचलला नाही. त्यानंतर थोडया वेळानंतर सरकारी वकील श्री. सावंत यांनी माझे मोबाईल वर फोन केला त्यावेळी मी त्यांना त्यांनी सांगीतल्याप्रमाणे दहा हजार ची सोय होत नाही असे सांगीतले. त्यावर लोकसेवक श्री.सावंत यांनी ''बरं बरं ठिक आहे चालेल उदया करा मग.... उदया परवा दोन दिवसात करा'' असे म्हणून दोन दिवस आहेत अजून असे सांगीतले. त्यावर मी ओके असे म्हटल्यावर फोन कट झाला. त्यामुळे पोलीस उप अधीक्षक श्री.गावडे यांचे सुचनेप्रमाणे मी पुन्हा माझ्या मोबाईलवरून लोकसेवक श्री. सावंत यांच्या मोबाईलवर फोन केला व मी सरकारी वकील श्री.सावंत यांना लाचेच्या रक्कमेत काही कमी होईल का असे विचारले असता, ''कराना कायतरी... ते आपल्या गवई साहेबाला सांगा ना... एका फटक्यात देतील ना.... माझं नाव सांगा'' असे बोलले. त्यावर मी त्यांना काहीतरी कमी करण्यास सांगीतल्यावर त्यांनी रागाने राहूदया नका देवू असे म्हणून फोन ठेवला. त्यानंतर पुन्हा माझ्या मोबाईलवरून सरकारी वकील श्री.सावंत यांना मोबाईलवर फोन करून सर कुठे आहेत आपण, येवू का भेटायला आता असे विचारले असता, त्यांनी ''आहे ऑफिसलाचं आहे.'' असे सांगीतले. त्यावर मी त्यांना, येतो दहा पंधरा मिनीटात येतो असे म्हणून फोन ठेवला. सदरचे सर्व फोन कॉल व्हॉईस रेकॉर्डरच्या मदतीने ध्वनिमुद्रीत करण्यात आलेले आहे.
त्यानंतर माझे अंगावर व्हॉईस रेकॉर्डर लावून पंच नं. 1 यांचेसह सरकारी वकील श्री.सावंत यांना भेटण्यास पाठविले. त्याप्रमाणे मी पालघर न्यायालयातील त्यांच्या रूममध्ये जावून भेटलो त्यावेळी त्यांनी माझेविरूध्दच्या खटल्यातील माझे निर्दोष मुक्ततेविरूध्द अपील केले नसल्याचा अहवाल पोलीस अधीक्षक कार्यालय पालघर येथे पाठविल्याचा मोबदला म्हणून यापुर्वी मागणी केलेली 10,000/- रू लाचेची रक्कम देण्यास सांगीतली ''आणले किती ते सांगा'' असे विचारले त्यावर मी त्यांना लाचेची रक्कम कमी करण्याची विनंती केली. तेंव्हा त्यांनी तडजोड करून शेवटी 7000/- रू स्विकारण्याचे मान्य केले. व किती वाजता भेटतो असे विचारले त्यावर मी त्यांना फोन करतो असे सांगून तेथून पंच नं. 1 यांचेसह निघून पडताळणी पथकाजवळ आलो.
त्यानंतर पोलीस अधीक्षक श्री.गावडे यांनी दोन्ही पंचांसमक्ष व्हॉईस रेकॉर्डर मध्ये ध्वनिमुद्रीत झालेले संभाषण ऐकले असता त्यामध्ये वरीलप्रमाणे संभाषण असून सरकारी वकील श्री.सावंत यांनी माझेकडे मागणी केलेल्या 10,000/- रू लाचेच्या रक्कमेमध्ये तडजोड करून शेवटी 7000/- रू स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले. त्यावेळी रात्रीचे 7.30 वा. ची वेळ झाली होती. परंतू सरकारी वकील श्री.सावंत हे त्यांच्या कार्यालयातून सायंकाळी 06.00 वा. निघून जातात त्यामुळे आता त्यांची भेट होणे शक्य नसल्याने पोलीस उप अधीक्षक श्री.गावडे यांच्या सुचनेप्रमाणे त्यांना त्यांच्या व्हॉटस्अप नंबरवर ''उदया सकाळी एका मित्राकडून पैसे भेटणार आहेत. तर कोठे भेटू'' असा मॅसेज पाठविला. त्यास सरकारी वकील श्री.सावंत यांनी ''Pacbatti '' असे म्हणून रिप्लाय दिला. म्हणजे दिनांक 26/10/2023 रोजी सकाळी पालघर येथील पाचबत्ती चौकात भेटण्याचे श्री.सावंत यांनी सांगितल्याने पोलीस उप अधीक्षक श्री.गावडे यांनी दिनांक 26/10/2023 रोजी सापळा आजमाविण्याचा निर्णय घेतला. याबाबत सविस्तर

पडताळणी पंचनामा करण्यात आलेला आहे.
त्यानंतर दिनांक 26/10/2023 रोजी सकाळी 08.30 वा. सर्वजण लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पालघर कार्यालयात हजर झाल्यानंतर मी सादर केलेल्या 500/- रू दराच्या 14 चलनी नोटा असे एकुण 7000/- रू लाचेच्या रक्कमेवर सापळा पुर्व पंचनाम्याची कार्यवाही पुर्ण करण्यात आली. त्यानंतर सरकारी वकील श्री.सावंत यांनी सांगीतल्याप्रमाणे पाचबत्ती चौकाजवळ जावून माझे मोबाईल नंबरवरून सरकारी वकील श्री.सावंत यांना फोन करून पाचबत्ती जवळ आल्याचे सांगीतले असता, त्यांनी पाचबत्ती येथील मनिषा डेअरी येथे येण्यास सांगीतले. सदरच्या फोनवरील संभाषण व्हॉईस रेकॉर्डरमध्ये ध्वनिमुद्रीत करण्यात आलेले आहे.
त्यानंतर लाचेच्या रक्कमेसह माझे अंगावर व्हॉईस रेकॉर्डर लावून पंच नं. 1 यांचेसोबत मला मनिषा डेअरी येथे पाठविले व माझे पाठोपाठ सापळा पथक मनिषा डेअरी, पाचबत्ती येथे येवून सापळा लावून थांबून राहीले. त्यावेळी मनिषा डेअरी येथे सरकारी वकील श्री.सावंत हे यापुर्वीच येवून डेअरी दुकानात बसले असल्याने मी ते ज्या टेबलला बसले होते तेथे जावून बसलो व त्यांचेशी बोलणी केल्यानंतर त्यांनी काल मागणी केलेले सात हजार रूपये असे म्हणून माझेकडील लाचेची रक्कम काढून सरकारी वकील श्री.सावंत यांचेसमोर धरली असता, त्यांनी ती उजव्या हाताने स्विकारून त्यांच्या नेसूस पॅन्टच्या पाठीमागील उजव्या बाजुच्या खिशामध्ये ठेवली. सर्व प्रकार सापळा पथक पाहत असल्याने सापळा पथकाने त्यांना ताब्यात घेतले व माझेकडील व्हॉईस रेकॉर्डर बंद केला.
अशा प्रकारे सरकारी वकील श्री. सुनिल बाबुराव सावंत, वय 51 वर्षे, अतिरीक्त सरकारी अभियोक्ता, अतिरीक्त सत्र न्यायालय, पालघर यांनी दिनांक 25/10/2023 रोजी माझेविरूध्दच्या खटल्यामध्ये मा.न्यायालयाने केलेल्या निर्दोष मुक्ततेविरूध्द अपील केलेले आहे अगर कसे? याबाबतचा अहवाल मा.पोलीस अधीक्षक कार्यालय, पालघर येथे पाठविण्यासाठी माझेकडे 10,000/- लाचेची मागणी करून तडजोडीअंती 7000/- रू स्विकारण्याचे मान्य केले. व सदरची मागणी केलेली लाचेची रक्कम त्यांनी स्वतः दिनांक 26/10/2023 रोजी 09.53 वा. मनिषा डेअरी, पाचबत्ती, पालघर प. येथे स्विकारली म्हणून माझी त्यांच्याविरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंध कायदा 1988 (सुधारणा 2018) चे कलम 7 प्रमाणे कायदेशीर फिर्याद आहे.
समक्ष

**13. Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

**(1) Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):
DATTATRAY BAJIRAO KINDRE(I (Inspector)) / PI **or** (किंवा)

**(2) Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):
**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

**(3) Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) Transferred to P.S.
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

District (जिल्हा):
on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

**15. Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अंमलदार
पालघर पोलीस ठाणे

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name (नाव):** DATTATRAY BAJIRAC
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** PI